**प्रेस नोट                    दिनांक :- १६/०६/२०२६**

# '' एमआयडीसी पोलीस ठाणेकडुन एकुण ६०,६५,६५६/- किंमतीचे दागीने चोरी झाल्याचा बनाव करणा-या गोल्डस्टार कंपनीच्या कर्मचा-यास अटक करुन गुन्हा उघडकीस आणुन १०० % मालमत्ता हस्तगत केलेबाबत ''

एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.क्र. ६३५/२६, कलम ३१६(४),३(५) मध्ये फिर्यादी नामे कांचन पवार, वय ४६ वर्षे यांच्या गोल्डस्टार या ज्वेलरीच्या कंपनीत काम करणारा कर्मचारी नामे अविनाष गंगाधर कदम वय २६ वर्षे याने फिर्यादींच्या कपंनीची रु.६०,६५,६५६/- किंमतीची ज्वेलरी डिलीव्हरी करण्यासाठी घेवून जात असताना रस्त्यात त्याचे दुचाकीला अपघात होवून तो खाली पडून बेशुद्ध झाल्याने कोणीतरी सदरची ज्वेलरी घेवून गेल्याचा बनाव रचला होता. सदर अपघातामध्ये त्याला कोणतीही दुखापत झालेली नसताना तो डॉक्टरांना मुदद्ाम त्रास होत असल्याचे सांगुन रूग्णालयातच ॲडमिट राहण्याच्या करीत असलेल्या अट्टाहासावरुन सदर अपघाताचा बनाव करून त्याच्या अज्ञात साथीदारांसह मिळून त्यानेच त्याच्या ताब्यात विश्वासाने डिलीव्हरी करण्याकरिता दिलेल्या मालमत्तेचा अपहार केल्याचे तपासामध्ये आढळुन आले म्हणुन नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने शेकडो सीसीटिव्ही फुटेजची तपासणी केली असता एक संशयित इसम घटना घडण्यापूर्वी घटनास्थळी आजूबाजूच्या परीसरात बराच वेळ फिरताना आढळला. त्याची ओळख पटवुन त्यास ताब्यात घेतले असता त्याने त्याचे नाव मनोज हनमंत जोगदंड, वय ४१ वर्षे असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर गोल्डस्टार कंपनीचा कर्मचारी अविनाश कदम व ताब्यात घेतलेल्या इसमास समोरा समोर करुन कसुन चौकशी केली असता ते दोघे मित्र असुन त्यांनी पुर्वनियोजीत कट रचुन सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली त्याप्रमाणे त्यांना नमुद गुन्हयात अटक केली व गुन्हयात अपहार केलेली संपुर्ण मालमत्ता ही रक्कम रु. ६०,६५,६५६/- हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) डॉ. मनोजकुमार शर्मा सो, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ. अभिनव देशमुख सो, मा. पोलीस उप आयुक्त, श्री दत्ता नलावडे सो, परिमंडळ १०, मुंबई व मा. सहा. पोलीस आयुक्त, गजानन पवार सो, अंधेरी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि श्री रविंद्र वाणी, पो.नि गुन्हे श्री महेश गुरव यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउपनि किरण पर्बत, पो.ह. बडे, पो.शि. जाधव, पो.शी. लोखंडे, पो. शि. कदम, पो.शि. शिंदे, पो.शि. पवार, पो.ह. विशाल पिसाळ(तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.